# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

(पुरवणी विषय पत्रिका)

नागपूर महानगरपालिकेची **शुक्रवार दिनांक २०/०३/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता** श्रीमंत राजे रघोजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे भरणाऱ्या सर्वसाधारण सभेकरिता मा. सदस्यांनी दिलेल्य नोटीसस विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

नागपूर
दिनांक :- **१७/०३/२०२०**

आदेशान्वये

हस्ता/-
(राजेश म. मोहिते)
निगम सचिव तथा उपायुक्त
महानगरपालिका, नागपूर

**विषय क्रमांक ७५ (नोटीस) :-**
**(आस्थापना विभाग)**
**(मा. श्री. संदीप प्रल्हाद सहारे)**

नागपूर महानगरपालिकेचा ठराव क्र. ३८९ दिनांक २०-०६-२०१९ नुसार सहाय्यक आयुक्त/वार्ड अधिकारी (अ.ज.)-१ पदाकरिता जाहिरात क्र. ५२०/पीआर, दिनांक १७-०१-२०१८ नुसार जाहिरात देण्यात आलेली होती. या जाहिरातीनुसार २४ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. अर्ज पडताळणी ६ उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरले. उर्वरित १८ उमेदवारांची लेखी परीक्षा महाऑनलाईन व्दारे दिनांक ०६-१०-२०१८ ला घेण्यात गुणानुक्रमांकानुसार ५ उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरिता दिनांक ०८-०२-२०१९ रोजी बोलविण्यात येऊन निवड समितीव्दारे प्रत्यक्ष मुलाखत घेऊन लेखी व मुलाखतीचा निकाल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर दि. ०८-०२-२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला. या मुलाखतीच्या यादीनुसार प्रथम क्र. श्री. घनश्याम पंधरे यांचे नाव असून व्दितीय क्रमांकावर श्री. योगेश गेडाम यांचे नाव आहे. श्री. योगेश गेडाम यांना प्रतिक्षा यादीत ठेवून श्री. घनश्याम पंधरे यांना नियुक्ती देणे अनिवार्य असतांना आज एक वर्षाचा कालावधी लोटला असतांना सुध्दा नियुक्ती न दिल्यामुळे होत असलेल्या अनियमिततेच्या संदर्भाने.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ७६ (नोटीस) :-**
**(आरोग्य विभाग)**
**(मा. ॲड॰ धर्मपाल मेश्राम)**

मनपा झोन क्र. १ ते ५ हया झोन अंतर्गत कचरा संकलन करणारी, ए.जी. एनव्हायरो कंपनीची कार्य, त्यांनी केलेला अनुबंध, त्यातील नियमावली, त्यातील कलमे व त्याचे अनुपालन व संदर्भातील अनियमितता संबंधी चर्चा करणे.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ७७ (नोटीस) :-**
**(आरोग्य विभाग (एस))**

नागपूर महानगरपालिकेतील ऐवजदार सफाई कामगारांना सेवेत नियमित करण्यात आले नियमित करण्याच्या आदेशात अटी व शर्तीतील अट क्र.

**(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)** १८ मध्ये लाड पागे समितीच्या शिफारशी अंर्तगत वारसा हक्काबाबतच्या कुठलाही लाभ मिळणार नाही असा उल्लेख आहे लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या नियुक्तीच्या बाबतीत चर्चा उपस्थित करणे व निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ७८ (नोटीस) :-**
**(आरोग्य विभाग (एस))**
**(मा. श्री. तानाजी सुकलाजी वनवे)**

नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत शहरातील विविध प्रभागात मोठया प्रमाणात इमारतीच्या बांधकामाचे काम सुरु असून या बांधकामाकरिता लागणारे साहित्य रस्त्यांच्या दुतर्फा ठेवत असल्यामुळे रहदारीस अडथळा होत असते. हे साहित्य ठेवण्याकरिता बांधकाम करणाऱ्यांनी महानगरपालिकेची परवानगी घेतली आहे किंवा नाही? तसेच बांधकामानंतर उरलेल्या साहित्यांचा तसेच सी.एन.डी. (C.N.D.) मटेरियल उचलण्याबाबत व ताबडतोब विल्हेवाट लावून रस्ता मोकळा करण्यास होत असलेल्या अनियमिततेच्या संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ७९ (नोटीस) :-**
**(आरोग्य विभाग (एम))**
**(मा. श्री. तानाजी सुकलाजी वनवे)**

सध्या संपूर्ण जगामध्ये जवळपास ९४ राष्ट्रांमध्ये कोरोना वायरसने थैमान घातले असून लक्षावधी जनता या कोरोना वायरसमुळे पिडीत असून हजारोंच्या संख्येंनी नागरीकांचा मृत्यु झला आहे. या कोरोना वायरस महामारीवर नागपूर महानगरपालिकेने काय उपाय योजना केली आहे या संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ८० (नोटीस) :-**
**(स्थावर विभाग)**
**(मा. सौ. आशा उईके)**

गांधीबाग झोन क्र. ६ अंतर्गत प्रभाग क्र. ८ मध्ये नागपूर महानगरपालिकेचे यंग मुस्लिम फुटबॉलचे मैदान असून सदर मैदान यंग मुस्लिम फुटबॉल क्लबकरिता महानगरपालिकेने लिजवर दिलेले आहे काय? ही बाब खरी आहे का? किंवा कसे? खरी असल्यास सार्वजनिक वापराचे मैदान कोणत्या नियमानुसार देण्यात आले असून या मैदानाची देखरेखीचे काम क्लब कडून करण्यात येते का? किंवा महानगरपालिका करते. उदा. इलेक्ट्रीक बिल, सामाजिक कार्यक्रमाकरिता या मैदानाचे शुल्क महानगरपालिका किंवा क्लब घेत आहे. तसेच मैदानात गैर वाजवी बांधकामाच्या अनियमिततेच्या चौकशी संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.
टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ८१ (नोटीस) :-**
**(स्लम विभाग)**

सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० हया तीन आर्थिक वर्षात रमाई घरकुल योजनेत महाराष्ट्र शासनाकडुन

**(मा. ॲड. धर्मपाल मेश्राम)** किती रक्कम प्राप्त झली? त्यापैकी किती रक्कम नेमकी खर्च झली? त्याचप्रमाणे किती लाभार्थ्यांना हया प्रत्येकी आर्थिक वर्षात हया योजनेचा लाभ मिळाला? व किती लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर होऊन रक्कमेकरिता प्रलंबित आहेत? हया संबंधी चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

टिप :- मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.